**Mumbai Metro Milestone**

**A Million plus commuters travelled within a week on Metro 2a and 7 since it was inaugurated by Hon. Prime Minister of India**

**Mumbai, 28 January 2023:**

Since the inauguration of phase 2 by Hon. Prime Minister, more than,10 lakh commuters travelled by Metro Line -2 A & 7. Now both metro lines get fully operational and got connected with Metro line 1, creating the first Metro network in Mumbai Metropolitan Region. Also, because of its easy connectivity with the railway line through Metro 1, millions of Mumbaikars have benefited from it. As well as The ridership Metro Line 2A & 7 crossed the 1-crore passenger milestone.

since the first phase was commissioned on 2nd April 2022, Metro 2A and 7 lines have been successful in providing uninterrupted services to around more than 1 crore Mumbaikars now. Almost 1,00,03,270 commuters travelled to date. A total of 22 trains provide 245 metro services daily on Metro Line 2A and 7.

**20k+ Mumbai 1cards issued**

**Seamless Travel Gets Boost**

**A total of 20,000 plus Mumbai 1 cards are issued till date.**

Mumbai 1 is the one common mobility card for all you need during travel. This card is getting more convenient for commuters as the Mumbai-1 card helps commuters to travel seamlessly. This card can be used in all metros in India &all city buses in Mumbai. They can buy Metro, BEST bus tickets etc. using this card. Also, you can do shopping too. People can get these cards on Metro ticket windows. Mumbai -1 card offers a 5-10% Discount on Every Trip, Monday to Saturday - 5 %, Sunday -10% & National Holidays- 10%.

**75k+ users downloaded Mumbai 1 Application**

Like Mumbai 1 Card, 75739 users (61742 Android & 13997 IOS) downloaded Mumbai-1 mobile application on their devices. Commuters can generate QR codes for tickets for their estimated distance through this application.

**"Mumbai 1 card and application is the advanced step for seamless travel of Mumbaikars. Now metro is not just a means of transport, it's becoming a new lifeline. More than 1 million Mumbaikars travelled by Metro within a week after the dedication Ceremony by Hon. Prime Minister, as well as another milestone we have achieved in the form of crossing 1 cr. mark of passengers. People are now switching their mode of transport from private vehicles to eco-friendly Metro" said Shri S.V.R. Srinivas IAS, Hon Metropolitan Commissioner, MMRDA.**

**मा. पंतप्रधानांनी उद्घाटन केल्यानंतर एका आठवड्यातच मेट्रो २ अ आणि ७ ने १० लाखांहून अधिक प्रवाशांनी केला प्रवास.**

**मुंबई, २८ जानेवारी, २०२३:**

मा. पंतप्रधानांनी उद्घाटन केल्यानंतर केवळ आठवड्याभरातच १० लाखाहून अधिक प्रवाशांनी मेट्रो मार्ग २अ आणि ७ ने प्रवास केला. आता या दोन्ही मेट्रो मार्गिका पूर्णपणे कार्यान्वित झाल्या असून मेट्रो मार्ग १ सोबत जोडल्या गेल्या आहेत, ज्यामुळे मुंबई महानगर प्रदेशात पहिले मेट्रो नेटवर्क तयार झाले आहे. या दोन्ही मेट्रो मार्गिका, मेट्रो १ च्या माध्यमातून रेल्वे मार्गाशी सहज जोडले गेल्याने लाखो मुंबईकरांना त्याचा लाभ झाला आहे.

**पहिल्या टप्प्यात कार्यान्वित झाल्या पासून मेट्रो २अ आणि ७ ने १ कोटी प्रवासी टप्पा पार केला**

२ एप्रिल २०२२ रोजी पहिला टप्पा कार्यान्वित झाल्यापासून, मेट्रो २ अ आणि ७ ने आतापर्यंत जवळपास १ कोटींहून अधिक मुंबईकरांना अखंड सेवा देण्यात यश मिळवले आहे. आजपर्यंत जवळपास १,००,०३,२७० इतक्या प्रवाशांनी प्रवास केला. मेट्रो मार्ग २अ आणि ७ वर एकूण २२ ट्रेन दररोज २४५ मेट्रो सेवा पुरवत आहेत.

**अखंड प्रवासाला चालना देण्यासाठी २० हजाराहून अधिक मुंबई १ कार्ड जारी केले**

**आजपर्यंत एकूण २० हजर पेक्षा अधिक मुंबई १ कार्ड जारी करण्यात आले आहेत.**

मुंबई 1 कार्ड हे तुम्हाला प्रवासादरम्यान आवश्यक असलेल्या सर्व गरजांसाठी एक सामान्य मोबिलिटी कार्ड आहे. मुंबई-१ कार्ड प्रवाशांना अखंडपणे प्रवास करण्यास मदत करत असल्याने हे कार्ड प्रवाशांसाठी अधिक सोयीचे होत आहे. हे कार्ड भारतातील सर्व महानगरांमध्ये आणि मुंबईतील सर्व सार्वजनिक वाहतूक सेवेसाठी वापरले जाऊ शकते. या कार्डचा वापर करून शॉपिंग सोबत तसेच मेट्रो, बेस्ट बसची तिकिटे इत्यादी खरेदी करू शकतात. मेट्रोच्या तिकीट खिडक्यांवर हे कार्ड उपलब्ध आहेत.

**मुंबई -1 कार्ड प्रत्येक सहलीवर ५-१०% सूट देते:-**

**सोमवार ते शनिवार - ५%, रविवार -१०% आणि राष्ट्रीय सुट्ट्या - १०%.**

**७५ हजाराहून अधिक लोकांनी केले मेट्रो १ ॲप डाउनलोड**

मुंबई १ कार्डप्रमाणेच ७५७३९ वापरकर्त्यांनी (६१७४२ Android आणि १३९९७ IOS) मुंबई-१ मोबाइल ॲप्लिकेशन त्यांच्या डिव्हाइसवर डाउनलोड केले. या ॲप्लिकेशनद्वारे प्रवासी त्यांच्या ठराविक अंतराच्या तिकिटांसाठी QR कोड तयार करू शकतात.

**मुंबई १ कार्ड आणि ॲप हे मुंबईकरांच्या अखंड प्रवासासाठी एक प्रगत पाऊल आहे. आता मेट्रो हे केवळ वाहतुकीचे साधन राहिले नसून ती एक नवी जीवनवहिनी बनत आहे. माननीय पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण सोहळ्यानंतर आठवडाभरात १ दशलक्षाहून अधिक मुंबईकरांनी मेट्रोने प्रवास केला. , तसेच मेट्रो कार्यान्वित झाल्यापासून आत्तापर्यंत १ कोटी प्रवासी टप्पा ओलांडण्यात आला आहे. लोक आता त्यांच्या वाहतुकीसाठी खाजगी वाहनांकडून पर्यावरणपूरक मेट्रोकडे वळत आहेत." असे महानगर आयुक्त श्री एस. व्ही.आर. श्रीनिवास भा.प्र. से. म्हणाले.**











मोबाईल चार्जिंग
230 V एसी /AC
Mobile charging
SBI